Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक ११६। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थी सुरक्षेसाठी उच्चस्तरीय बैठकीची मागणी

(पान २ वर)



## Selected

### शिवसेनेतर्फे यंदाही दिल्लीत 'सिंदूर महारक्तदान यात्रा'!

**मुंबई | प्रतिनिधी:** शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेतर्फे यंदाही नवी दिल्ली येथे 'सिंदूर महारक्तदान यात्रा' आयोजित करण्यात आली आहे. देशाच्या सीमेवर तैनात असलेल्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा विशेष रक्तदान उपक्रम राबविण्यात येणार असून, यात १,२०० हून अधिक शिवसैनिक सहभागी होऊन रक्तदान करणार आहेत. ही महारक्तदान यात्रा ९ ऑगस्ट २०२६ रोजी आर्मी हॉस्पिटल रिसर्च अँड रेफरल, शिवसेनेने हा उपक्रम सलग दुसऱ्या वर्षी आयोजित केला आहे. या उपक्रमाद्वारे देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच रक्ताचा तुटवडा भासणाऱ्या रुग्णांना मदत करण्याचाही उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

### खड्ड्यांवरील टीकेनंतर मंत्री गिरीश महाजन यांची ग्वाही

# 'नाशिकला राज्यातील सर्वांत सुंदर शहर बनवणार'!

## आठ दिवसांत खड्डेमुक्ती, चार महिन्यांत काँक्रीटचे रस्ते पूर्ण करण्याचा दावा

जन सम्राट टाईम्स

**नाशिक । नाशिक शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांमध्ये वाढलेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी रविवारी महत्त्वाची प्रतिक्रिया देत शहराला राज्यातील सर्वांत सुंदर शहर बनविण्याचा संकल्प पुन्हा एकदा व्यक्त केला.**

शहरातील विविध विकासकामांमुळे तात्पुरती गैरसोय होत असली तरी आठ दिवसांत प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात येतील, तर पुढील चार महिन्यांत काँक्रीट रस्त्यांची कामे पूर्ण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परिसरात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना महाजन म्हणाले की, शहरात ड्रेनेज, पाणीपुरवठा, फायबर केबल, एमएनजीएल गॅस लाईनसह आठ ते नऊ प्रकारच्या मूलभूत सुविधा उभारण्याची कामे एकाचवेळी सुरू आहेत. या कामांसाठी रस्ते खोदावे लागल्याने अनेक ठिकाणी खड्डे निर्माण झाले आहेत. मात्र, ही परिस्थिती तात्पुरती असून नागरिकांना कायमस्वरूपी



दर्जेदार सुविधा देण्याच्या दृष्टीने ही कामे सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाजन यांनी सांगितले की, पावसाचा जोर कमी होताच युद्धपातळीवर खड्डे बुजविण्याचे काम सुरू असून, विविध आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ते दुरुस्त केले जात आहेत. पुढील चार महिन्यांत शहरातील प्रमुख रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण झाल्यानंतर किमान ४० वर्षे रस्त्यांवर खड्डे पडणार नाहीत, असा दावा त्यांनी केला. दरम्यान, शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेसाठी संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आल्याबाबत विचारले असता, महाजन यांनी ही वेळ दोषारोप करण्याची नसून कामे पूर्ण करण्याची असल्याचे सांगितले. अधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदारांना कामात दिरंगाई न करण्याच्या सक्त सूचना दिल्या असून, कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे जाताना मखमलाबाद-म्हसरूळ मार्गावरील खड्ड्यांचा त्रास मंत्री महाजन यांनी स्वतः अनुभवला. त्यांनी वाहनातून उतरून रस्त्यांची पाहणी केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. कार्यक्रमातही त्यांनी नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीची कबुली देत, लवकरच परिस्थिती सुधारेल, अशी ग्वाही दिली. खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या दीपाली बेळे यांच्या कुटुंबीयांची महाजन यांनी भेट घेऊन सांत्वन केले. उपचारासाठी झालेला मोठा खर्च लक्षात घेता राज्य शासनाच्या वतीने ₹५ लाखांची आर्थिक मदत देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिफारस करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### पावसामुळे कामांना विलंब

महाजन यांनी विक्रमी पावसामुळे अनेक विकासकामांवर परिणाम झाल्याचे नमूद केले. डांबर व व्यावसायिक डिझेलच्या वाढलेल्या किमतींमुळे कंत्राटदारांच्या खर्चात मोठी वाढ झाली असून, मुख्यमंत्री यांच्या मंजुरीने कंत्राटदारांना 'स्टार रेट' देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी स्वच्छतेच्या बाबतीत नाशिक शहराने देशात इंदूरनंतर मानाचे स्थान मिळविल्याचा उल्लेख करत, विकासकामे पूर्ण झाल्यानंतर नाशिक राज्यातील सर्वांत सुंदर शहर म्हणून ओळखले जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

## तरसोद बोगद्यावरील पाणी साचण्याच्या समस्येवर खासदार स्मिता वाघ यांचा दणका

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद। (प्रतिनिधी):** तरसोद बोगद्याजवळील सर्व्हिस रोडवर दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचून वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याच्या समस्येची जळगावच्या खासदार स्मिता वाघ यांनी रविवारी प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांच्या सातत्यपूर्ण तक्रारींची दखल घेत त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळीच जाब विचारत पाच ते सहा दिवसांत पाणी निचऱ्याचे काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांकडून पाणी निचऱ्याचे काम अतिक्रमणामुळे रखडल्याचे कारण सांगण्यात आले. यावर खासदार वाघ यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत, कारणे न सांगता नागरिकांच्या समस्येवर तातडीने कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आदेश दिले. दरवर्षी पावसाळ्यात या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत होते, वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागतो आणि अपघाताचा धोका निर्माण होतो. त्यामुळे यापुढे या



कामात कोणताही विलंब सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावले. यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा नगरसेवक लालचंद पाटील यांनी तरसोद बोगद्यापुढील उंटबीडी रिक्षा स्टॉप परिसरातील अरुंद व खचलेल्या रस्त्याच्या समस्येकडे खासदारांचे लक्ष वेधले. खराब रस्त्यामुळे एसटी बस गावात येण्यास टाळाटाळ करत असल्याने विद्यार्थी, नोकरदार आणि ग्रामस्थांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रश्नाचीही तातडीने दखल घेत संबंधित विभागामार्फत पाहणी करून आवश्यक कार्यवाही केली जाईल आणि लवकरच योग्य तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन खासदार स्मिता वाघ यांनी दिले.

पाहणी दौऱ्यावेळी नशिराबादचे नगराध्यक्ष योगेश पाटील, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा नगरसेवक लालचंद पाटील, सभापती कीर्तिकांत चौबे, सभापती मनोज पाटील, नगरसेवक बापू बोढरे, सचिन महाजन यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी उपस्थित होते. पाणी निचऱ्याच्या कामात स्थानिक पातळीवर कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही आणि प्रशासनाला पूर्ण सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही यावेळी लोकप्रतिनिधींनी दिली. खासदार स्मिता वाघ यांच्या पाहणीनंतर तरसोद बोगद्याजवळील पाणी साचण्याची समस्या, महालक्ष्मी मंदिराजवळील चौफुलीवरील प्रकाशव्यवस्था तसेच उंटबीडी रिक्षा स्टॉप परिसरातील रस्त्याचा प्रश्न लवकर मार्गी लागेल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## महिला आशिया कपसाठी टीम इंडियाचा संघ जाहीर!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** महिला आशिया कप 2026 स्पर्धेसाठी भारतीय महिला क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. निवड समितीने मागील संघात केवळ एकच बदल केला असून दुखापतग्रस्त श्रेयंका पाटील हिला संघाबाहेर ठेवण्यात आले आहे. तिच्या जागी लेगस्पिन अष्टपैलू प्रेमा रावत हिला कायम ठेवण्यात आले आहे.

कर्णधारपदाची जबाबदारी पुन्हा एकदा हरमनप्रीत कौर हिच्याकडे सोपवण्यात आली आहे. यंदाच्या संघातील सर्वात मोठी चर्चा म्हणजे लॉर्ड्स कसोटीत शानदार शतक झळकावूनही यष्टिरक्षक फलंदाज यास्तिका भाटिया हिला पुन्हा एकदा टी-20 संघात स्थान मिळालेलं नाही. तिच्याऐवजी निवडकर्त्यांनी 18 वर्षीय युवा यष्टिरक्षक जी कमालिनी हिच्यावरच विश्वास कायम ठेवला आहे.इंग्लंडविरुद्ध लॉर्ड्स कसोटीत दमदार शतक झळकावत यास्तिका भाटियाने सर्वांचे लक्ष वेधले होते. तिच्या या खेळीमुळे आशिया कप संघात पुनरागमन होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र निवडकर्त्यांनी तिच्याकडे पुन्हा एकदा दुर्लक्ष करत युवा जी कमालिनीलाच संधी दिली. त्यामुळे यास्तिकाला सलग दुसऱ्यांदा टी-20 संघाबाहेर राहावं लागलं आहे.संघातील एकमेव बदल श्रेयंका पाटीलच्या रूपाने झाला आहे. घोट्याच्या लिगामेंटच्या दुखापतीतून ती अद्याप पूर्णपणे सावरलेली नसल्याने तिची आशिया कपसाठी निवड करण्यात आलेली नाही. त्यामुळे तिच्या जागी लेगस्पिन अष्टपैलू प्रेमा रावत हिला कायम ठेवण्याचा निर्णय निवडकर्त्यांनी घेतला आहे. 24 वर्षीय प्रेमा रावत हिला यापूर्वी महिला टी-20 विश्वचषकात संधी मिळाली होती. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात तिने 2 चेंडूत नाबाद 3 धावा केल्या होत्या. गोलंदाजीत तिने 2 षटकांत 21 धावा दिल्या, मात्र तिला एकही विकेट मिळाली नव्हती. तरीही तिच्या क्षमतेवर विश्वास दाखवत निवडकर्त्यांनी आशिया कपसाठीही तिला संघात कायम ठेवले आहे.


दरम्यान, भारतीय महिला संघातील चार प्रमुख खेळाडू सध्या इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या 'द हंड्रेड' स्पर्धेत खेळत आहेत. उपकर्णधार स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा आणि ऋचा घोष या चारही खेळाडू या स्पर्धेत व्यस्त आहेत. महिला आशिया कप स्पर्धा ऑगस्टच्या अखेरीपासून ते सप्टेंबरच्या मध्यापर्यंत खेळवली जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर 17 ते 22 सप्टेंबरदरम्यान जपानमध्ये आशियाई क्रीडा स्पर्धा (एशियन गेम्स) होणार असून, त्या स्पर्धेतही भारतीय महिला संघाकडून सुवर्णपदकाची मोठी अपेक्षा असेल.

## प्राध्यापकावर भ्रष्टाचारासह रुग्णाच्या मृत्यूला कारणीभूत असल्याचा आरोप

### गैरकारभारनिष्पापरुग्णाच्याजीवावर!

जन सम्राट टाईम्स

मुंबई। (प्रतिनिधी) : मुंबईतील प्रसिद्ध जे.जे. रुग्णालयाच्या अस्थिरोगशास्त्र (आर्थोपेडिक्स) विभागात एका वरिष्ठ प्राध्यापकाविरुद्ध अत्यंत गंभीर आणि धक्कादायक आरोप झाल्यामुळे वैद्यकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. डॉ. नितीन महाजन यांच्यावर निवासी डॉक्टरांचा मानसिक व आर्थिक छळ करणे, बनावट सह्या करणे आणि वैद्यकीय हलगर्जीपणामुळे एका रुग्णाचा बळी जाण्यास कारणीभूत असल्याचा आरोप निवेदने व तक्रारींमधून करण्यात आला आहे. सध्या रुग्णालयात आणि वैद्यकीय क्षेत्रात या आरोपांची जोरदार चर्चा असून, विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या सर्व आरोपांचे लेखी पुरावे आणि तक्रारींचे तपशील उघड झाले आहेत, ज्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे.निवासी डॉक्टरांना वेठीस धरून त्यांच्याकडून अक्षरशः आर्थिक खंडणी वसूल केल्यासारखा प्रकार या विभागात चालत असल्याचे आरोपांवरून दिसते. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी तब्बल १५ कनिष्ठ निवासी डॉक्टरांनी अधिष्ठातांना (डीन) दिलेल्या सामायिक पत्रात म्हटले आहे की, डॉ. महाजन यांच्या जेवणावळी, महागडी घड्याळे, इयरफोन्स आणि सण-उत्सवांतील भेटवस्तूंचा वैयक्तिक खर्च निवासी डॉक्टरांवर सक्तीने टाकला जातो. तसेच, डॉ. रौनक सिन्हा यांनी ५ मार्च २०२६ रोजी दिलेल्या स्वतंत्र पत्रात या बेकायदेशीर आणि वैयक्तिक कामांमुळे आपण नैराश्यात गेलो असल्याचे धक्कादायक वास्तव मांडले आहे. जे विद्यार्थी या आर्थिक लुटीला आणि वैयक्तिक कामांना नकार देतात, त्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य करून अपमानास्पद वागणूक दिली जाते, असाही आरोप या



पत्रांमध्ये करण्यात आला आहे. या सर्व गैरकारभाराचा सर्वात भयंकर फटका एका निष्पाप रुग्णाला बसल्याचा खळबळजनक आरोप एका घटना अहवा मध्ये नमूद आहे. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी भास्कर मुगम या अत्यंत गंभीर जखमी रुग्णाला डॉ. महाजन यांच्या युनिटमध्ये दाखल करून घेण्यास व वेळेवर उपचार देण्यास टाळाटाळ करण्यात आली. त्याला योग्य संदर्भ पत्रांविनाच सायन आणि केईएम रुग्णालयात रेफर करून वाऱ्यावर सोडण्यात आले. या वेळेच्या अपव्ययामुळे आणि वैद्यकीय हलगर्जीपणामुळे केईएम रुग्णालयात त्या रुग्णाचा पाय कापावा लागलाbआणि अखेर त्याचा मृत्यू झाला. एका प्राध्यापकाच्या बेजबाबदारपणामुळे व प्रवेश नाकारल्यामुळे रुग्णाला जीव गमवावा लागल्याच्या या अत्यंत संतापजनक घटनेची चर्चा सध्या सर्वत्र सुरू आहे. भ्रष्टाचाराची आणि मनमानी कारभाराची ही साखळी इथेच थांबत नाही, तर यात थेट बनावटगिरी (फोर्जरी) चाही समावेश असल्याचा आरोप आहे. ५ मार्च २०२६ रोजी पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी थेट महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कडे धाव घेत एक गंभीर तक्रार दाखल केली आहे. विद्यार्थ्यांच्या संमतीशिवाय आणि माहितीशिवाय त्यांचे पदव्युत्तर मार्गदर्शक (पीजी गाईड) बदलून डॉ. महाजन यांची नियुक्ती करण्यासाठी कागदपत्रांवर विद्यार्थ्यांच्या बनावट सह्या केल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

## राज्यातील पारंपरिक विणकरांना गणेशोत्सवाची भेट!

### उत्सव भत्त्यासाठी शासन निर्णय जारी १.२५ कोटींहून अधिक निधीस मंजुरी

जन सम्राट टाईम्स

**यावल | प्रतिनिधी :** राज्य शासनाने पारंपरिक हातमाग व वस्त्रोद्योग क्षेत्रातील नोंदणीकृत विणकरांना गणेशोत्सवानिमित्त मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पारंपरिक विणकरांसाठी उत्सव भत्ता मंजूर करण्यात आला असून, त्यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय (जीआर) जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो पात्र विणकरांना थेट आर्थिक मदत मिळणार आहे. शासनाच्या निर्णयानुसार पैठणी साडी, हिमिरु शाल, करवत काठी साडी, घोंगडी आणि खण फॅब्रिक या पारंपरिक वस्त्रोद्योगाशी संबंधित प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. पारंपरिक कला व हातमाग उद्योगाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. या योजनेसाठी शासनाने एकूण ₹१ कोटी २५ लाख ९७ हजार निधी मंजूर केला असून, संबंधित लाभार्थ्यांना उत्सव भत्त्याचे वितरण करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार पात्र लाभार्थ्यांना पुढीलप्रमाणे आर्थिक सहाय्य मिळणार आहे. महिला विणकर: प्रत्येकी ₹१५,००० उत्सव भत्ता. पुरुष विणकर: प्रत्येकी ₹१०,००० उत्सव भत्ता. गणेशोत्सवाच्या तोंडावर मिळणाऱ्या या आर्थिक सहाय्यामुळे पारंपरिक विणकरांना मोठा दिलासा मिळणार आहे. वाढते उत्पादन खर्च, बाजारपेठेतील स्पर्धा आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या हातमाग कारागिरांना या निधीचा उपयोग दैनंदिन गरजा तसेच व्यवसायासाठी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्यातील पारंपरिक वस्त्रोद्योगाला चालना देतानाच विणकरांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल असल्याची भावना विणकरांमध्ये व्यक्त होत आहे. ज्य शासनाने पारंपरिक हातमाग व वस्त्रोद्योग क्षेत्रातील नोंदणीकृत विणकरांना गणेशोत्सवानिमित्त मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिळालेल्या या भत्त्यामुळे सणाचा आनंद द्विगुणित होण्याबरोबरच पारंपरिक कला आणि हातमाग उद्योगाला बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## पारोळा शहरातील वाढीव वस्त्यांनाही मिळणार शुद्ध पाणी

### ₹53.70 कोटींच्या पाणीपुरवठा योजनेला पूरक कामांची सुरुवात

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी:** पारोळा शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. शहरातील वाढीव वस्त्यांपर्यंत शुद्ध पाणीपुरवठा पोहोचविण्यासाठी नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ आमदार अ‍ॅड. अमोल पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. शहरासाठी मंजूर झालेल्या सुमारे ₹५३.७० कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचे ८० ते ९० टक्के काम पूर्ण झाले असून, लवकरच नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठ्याचा लाभ मिळणार आहे. मात्र, शहराच्या वाढत्या विस्तारामुळे काही नवीन वस्त्या या योजनेपासून वंचित राहिल्या होत्या. या भागातील नागरिकांच्या सातत्यपूर्ण मागणीची दखल घेत वाढीव वस्त्यांमध्ये नवीन पाईपलाईन टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. या कामामुळे शहरातील प्रत्येक घरापर्यंत सुरक्षित व शुद्ध पाणी पोहोचविण्याचा मार्ग मोकळा होणार असून, भविष्यात पाणीटंचाईच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनीष पाटील, तालुकाप्रमुख मधुकर पाटील, उपनगराध्यक्ष अ‍ॅड. रोहन मोरे, नगरसेवक नितीन सोनार, राजाराम पाटील, राजाबापू पाटील, छोटूभाऊ पाटील, विवेक पाटील, नझीरखान बेलदार, दीपक अनुष्ठान, अमोल शिरोळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.यावेळी शहरातील कोणताही भाग पाणीपुरवठ्यापासून वंचित राहू नये आणि प्रत्येक नागरिकाला नियमित, सुरक्षित व शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे, हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.



### अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित

शहरासाठी मंजूर झालेल्या सुमारे ₹६३.७० कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचे ८० ते ९० टक्के काम पूर्ण झाले असून, लवकरच नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठ्याचा लाभ मिळणार आहे.या योजनेपासून वंचित राहिल्या होत्या.वस्त्यांमध्ये नवीन पाईपलाईन टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. या कामामुळे शहरातील प्रत्येक घरापर्यंत सुरक्षित व शुद्ध पाणी पोहोचविण्याचा मार्ग मोकळा होणार असून, भविष्यात पाणीटंचाईच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनीष पाटील, तालुकाप्रमुख मधुकर पाटील, उपनगराध्यक्ष अ‍ॅड. रोहन मोरे, नगरसेवक नितीन सोनार, राजाराम पाटील, राजाबापू पाटील, छोटूभाऊ पाटील, विवेक पाटील, नझीरखान बेलदार, दीपक अनुष्ठान, अमोल शिरोळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# उपवर्गीकरणाविरोधात राज्यव्यापी जनआंदोलनाची हाक; पद्मालय बैठकीत संघर्षाची दिशा निश्चित!

## 'उपवर्गीकरण संविधानविरोधी' चा वक्त्यांचा दावा; मोर्चासाठी नियोजन समित्या स्थापन

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ| प्रतिनिधी :** उपवर्गीकरणाच्या विषयावर व्यापक जनजागृती करून राज्यव्यापी आंदोलन उभारण्याची गरज असल्याचे मत विविध वक्त्यांनी पद्मालय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत व्यक्त केले. संविधान, सामाजिक समता आणि विविध समाजघटकांतील ऐक्य अबाधित राखण्यासाठी संघटित लढा उभारण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. बैठकीत जिल्हास्तरीय मोर्चाचे नियोजन, जनसंपर्क मोहीम आणि संघर्षाची पुढील दिशा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना मुकुंद सपकाळे यांनी उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी उपवर्गीकरण संविधानविरोधी असल्याचा दावा करत, या निर्णयामुळे समाजात जातीय तणाव वाढण्याची शक्यता असल्याचे मत व्यक्त केले. समाजातील विविध घटकांमध्ये संघर्ष किंवा शत्रुत्व निर्माण होऊ नये, यासाठी संवाद आणि प्रबोधनाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. मतभेद असलेल्या समाजघटकांशी संवाद साधून त्यांच्यातील गैरसमज दूर करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले. आरपीआय (आठवले गट) चे जिल्हाध्यक्ष राजूभाऊ सूर्यवंशी यांनी उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर संघटित आंदोलनाची गरज अधोरेखित केली. त्यांनी जिल्हाभर नियोजन समित्या स्थापन करून सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचे आवाहन केले. लोकशाही मार्गाने मोर्चे, आंदोलने आणि जनजागृतीच्या माध्यमातून भूमिका शासनापर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. बैठकीचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सत्यजित साळवे यांनी केले. त्यांनी संविधानातील समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांवर प्रकाश टाकत विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. यावेळी डॉ. मिलिंद बागुल, प्रा. प्रितीलाल पवार, प्रा. किसन हिरोळे आणि प्रा. डॉ. विजय लामकाणेकर यांनीही आपली मते मांडत सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन केले. ोर्चाच्या नियोजनासंदर्भात सुनील सोनवणे, जगदीश सपकाळे, महेंद्र केदार, मिलिंद सोनवणे, डॉ. प्रकाश वानखेडे, सोमा भालेराव, गोकुळ केदार, प्रणय नन्नवरे, अविनाश नन्नवरे, रावसाहेब भालेराव, पंकज नन्नवरे, आशुतोष सोनवणे, गोविंद जाधव आणि वाल्मीक जाधव यांनी विविध सूचना मांडल्या. तसेच पंकज सोनवणे, संतोष गायकवाड, दत्तू सोनवणे, मनोहर गाढे, रोहन सूर्यवंशी आणि दिलीप सपकाळे यांनीही चर्चेत सहभाग नोंदवून आंदोलनाच्या पुढील रणनीतीबाबत आपली मते व्यक्त केली. बैठकीत जिल्हाभर जनजागृती मोहीम राबविणे, विविध संघटनांना सहभागी करून व्यापक लोकचळवळ उभी करणे आणि शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यावर भर देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापूराव पानपाटील यांनी केले, तर सुभाष सपकाळे यांनी आभार मानले.

## वनपट्टेधारकांसाठी महसूल विभागाचा ऐतिहासिक निर्णय!



जन सम्राट टाईम्स

**विशेष।** प्रतिनिधी : राज्याच्या महसूल विभागाने वनपट्टेधारक आणि वनहक्कधारकांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आता त्यांच्यासाठी स्वतंत्र व कायदेशीर मान्यताप्राप्त 'गाव नमुना ७-ई' (अधिकार अभिलेख) आणि '१२-ई' (पीक नोंदवही) तयार करण्यात आली आहे. हे अभिलेख थेट महाभूलेख (MAHABHULEKH) प्रणालीशी जोडण्यात आल्याने वनपट्टेधारकांना अधिकृत शेतकरी म्हणून ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यापूर्वी वनहक्कधारकांची नोंद पारंपरिक ७/१२ उताऱ्यावर केवळ 'इतर हक्क' या सदरात केली जात होती.

त्यामुळे अनेक शासकीय कृषी योजना आणि आर्थिक सुविधांचा लाभ घेण्यात त्यांना अडचणी येत होत्या. नवीन '७-ई' आणि '१२-ई' अभिलेखामुळे ही अडचण दूर होणार असून, वनपट्टेधारकांना अधिकृत शेतकरी म्हणून मान्यता मिळणार आहे. महसूल दिनाचे औचित्य साधून या उपक्रमाच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यात आली.

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील एका लाभार्थ्याला राज्यातील पहिला '७-ई / १२-ई' उतारा तयार करून पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील लाखो वनपट्टेधारक आणि वनहक्कधारक शेतकऱ्यांना अधिकृत शेतकरी म्हणून ओळख मिळण्याबरोबरच विविध शासकीय योजनांचा लाभ अधिक सुलभपणे मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## पीक विमा अर्जासाठी १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

### राज्य सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा




जन सम्राट टाईम्स

**पारोळा। प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत राज्य शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अर्जाची अंतिम मुदत १० ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविली आहे. यापूर्वी अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ होती. मात्र, तांत्रिक अडचणी, संकेतस्थळावरील संथ गती आणि इंटरनेट समस्यांमुळे अनेक शेतकऱ्यांना अर्ज करता न आल्याने ही मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. अल निनोच्या संभाव्य संकटाचा विचार करून राज्यातील एकही पात्र शेतकरी पीक विमा योजनेपासून वंचित राहू नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेऊन तातडीने अर्ज सादर करावेत, असे आवाहनही कृषिमंत्र्यांनी केले आहे. पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांनी संबंधित बँकेशी संपर्क साधून अर्जाची प्रक्रिया पूर्ण करावी. तर पीक कर्ज न घेतलेल्या शेतकऱ्यांनी PMFBY पोर्टल किंवा PMFBY Crop Insurance मोबाईल ॲपच्या माध्यमातून अथवा जवळच्या सीएससी (CSC) सेवा केंद्रावर जाऊन अर्ज भरावा, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, आतापर्यंत राज्यातील ६१ लाख ८२ हजार २१८ शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेसाठी नोंदणी केली आहे. मात्र, संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणी, इंटरनेटचा कमी वेग आणि इतर कारणांमुळे अनेक पात्र शेतकरी अर्जापासून वंचित राहिले होते. त्यामुळे शासनाने अर्जासाठी अतिरिक्त मुदत देण्याचा निर्णय घेतला. राज्यात सर्वाधिक छत्रपती संभाजीनगर विभागातून १३ लाख २५ हजार, त्यानंतर अमरावती विभागातून ६ लाख ९१ हजार ९७३, पुणे विभागातून ६ लाख ७ हजार ६६३, नागपूर विभागातून ४ लाख ५३ हजार ३८३, नाशिक विभागातून ३ लाख ३३ हजार ३८५, लातूर विभागातून २ लाख ४२ हजार ८२६, कोल्हापूर विभागातून २ लाख ४० हजार २५३ आणि कोकण विभागातून १ लाख २ हजार ३३५ शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी नोंदणी केली आहे. राज्यातील एकही पात्र शेतकरी प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील असून वाढीव मुदतीचा लाभ घेण्यास विलंब करू नये, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

## आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थी सुरक्षेसाठीउच्चस्तरीयबैठकीचीमागणी

### अधीक्षकांना साप्ताहिक व बदली सुट्ट्यांचा लाभ देण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** राज्यातील शासकीय व अनुदानित आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहांमधील विद्यार्थी सुरक्षा, बालसंरक्षण, रिक्त पदांची भरती तसेच अधीक्षक व अधीक्षिकांच्या सेवा सुविधांबाबत तातडीने निर्णय घेण्यासाठी आदिवासी विकास मंत्री यांनी कास्ट-ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघासोबत उच्चस्तरीय बैठक आयोजित करावी, अशी मागणी महासंघाने केली आहे. या संदर्भात धुळे येथील प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून राज्यभरातील आदिवासी विकास विभागाच्या विविध कार्यालयांमध्येही एकाच दिवशी निवेदने सादर करण्यात आली. महासंघाने दिलेल्या निवेदनात मोहनदरी, मोरोशी आणि टिटंबा येथील आश्रमशाळांमध्ये घडलेल्या घटनांमुळे निवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनल्याचे नमूद करण्यात आले आहे. अशा घटनांसाठी केवळ अधीक्षक, मुख्याध्यापक किंवा गृहपाल यांनाच जबाबदार धरणे योग्य नसून अपुरे मनुष्यबळ, मोठ्या प्रमाणातील रिक्त पदे, समुपदेशक व आरोग्य कर्मचाऱ्यांचा अभाव, सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी आणि धोरणात्मक कमतरताही जबाबदार असल्याचे महासंघाने स्पष्ट केले. निवेदनानुसार आदिवासी विकास विभागातील ४,४१० मंजूर पदे रिक्त असून प्राथमिक शिक्षकांच्या सुमारे ५० टक्के जागा अद्याप रिक्त आहेत. याशिवाय पूर्वी मृत घोषित करण्यात आलेली ६,०८८ पदे पुनर्जीवित करून सर्व रिक्त पदांची तातडीने भरती करण्याची मागणी करण्यात आली आहे. महासंघाने राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग (NCPCR) यांच्या नियमावलीची संपूर्ण अंमलबजावणी करण्याचीही मागणी केली आहे. प्रत्येक आश्रमशाळेत समुपदेशक, परिचारिका, सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचारी, आचारी व मदतनीस यांची पदनिर्मिती करणे, मोबाईल मेडिकल युनिट, टेलिमेडिसिन सुविधा, नियमित आरोग्य तपासणी आणि विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य समुपदेशन उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच गृहपाल व मुख्याध्यापकांच्या पदोन्नती धोरणात सुधारणा करून स्वतंत्र 'चाइल्ड केअर सपोर्ट कॅडर' स्थापन करण्याचीही मागणी करण्यात आली. याचबरोबर शासकीय आश्रमशाळांमध्ये कार्यरत पुरुष अधीक्षक व महिला अधीक्षिकांना शासनाच्या परिपत्रकानुसार साप्ताहिक सुट्टी, बदली सुट्टी आणि सार्वजनिक सुट्ट्यांचा लाभ प्रत्यक्षात देण्यात यावा, अशी स्वतंत्र मागणीही करण्यात आली आहे. संबंधित तरतूद अस्तित्वात असूनही अनेक आश्रमशाळांमध्ये त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचे महासंघाने नमूद केले.आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत सर्व आश्रमशाळांना तातडीने आदेश जारी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## भंडारा येथे साहित्यसम्राट लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती

### लोकप्रतिनिधी, मान्यवर आणि नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती

जन सम्राट टाईम्स



**भंडारा| प्रतिनिधी:** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सामाजिक संस्था, भंडारा यांच्या वतीने साहित्यसम्राट लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती १ ऑगस्ट २०२६ रोजी विविध सामाजिक उपक्रमांसह उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जेलरोड येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथे सकाळी ११.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा जयंती सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन भंडारा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. मधुराताई मदनकर यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधान परिषदेचे आमदार परिणयजी फुके होते. यावेळी भंडारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार नरेंद्रजी भोंडेकर, तुमसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजूभाऊ कोरेमारे, सामाजिक कार्यकर्ते भगवानजी गायधने गुरुजी आणि महालगावे सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सामाजिक संस्थेचे अध्यक्ष गणेशभाऊ ढोके, उपाध्यक्ष ईश्वरजी कांबळे, सचिव बाबासाहेब जाधव, कोषाध्यक्ष किशोर खंडाळे, सहसचिव राजेश खडसे, संघटक अनिल बावणे तसेच कार्यक्रम संयोजक राहुलजी लोखंडे, अनुपजी ढोके आणि क्रिष्णाजी खडसे यांनी विशेष परिश्रम घेतले. याशिवाय जिल्हा लहुजी सेना अध्यक्ष नामदेवजी निखाडे, महिला अध्यक्षा संगीता बावणे, सोशल मीडिया प्रमुख फकिराजी खडसे तसेच कार्यकारिणी सदस्य जयराम बावणे, दिनेश हापसे, राहुल डोंगरे, रामुजी बावणे, लोकेश डोंगरे, सेवाबाई जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि समतेच्या विचारांना अभिवादन करण्यात आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सामाजिक संस्था, भंडारा यांच्या वतीने साहित्यसम्राट लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती १ ऑगस्ट २०२६ रोजी विविध सामाजिक उपक्रमांसह उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जेलरोड येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथे सकाळी ११.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा जयंती सोहळा पार पडला. त्यांच्या कार्याचा आदर्श समाजाने जपावा, असा संदेश मान्यवरांनी आपल्या मनोगतातून दिला.

## काचमाळीसमाजविकासमंडळ,लासूरच्यानवीनकार्यकारिणीचीघोषणा

जन सम्राट टाईम्स



**चोपडा। प्रतिनिधी:** श्री क्षत्रिय काच माळी समाज विकास मंडळ, लासूर या संस्थेच्या सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. समाजातील ऐक्य, संघटन बळकटी आणि सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. या निवडीत आत्माराम कौतिक गंभीर (सर) यांची सलग सहाव्यांदा बिनविरोध अध्यक्षपदी निवड झाली. त्यांच्या निवडीबद्दल चोपडा तालुक्याचे आमदार प्रा. चंद्रकांत बळीराम सोनवणे यांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले व भावी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी लासूर पंचक्रोशीतील शिवसैनिक, समाजबांधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनिर्वाचित कार्यकारिणी (सन २०२६–२०३१)

अध्यक्ष: आत्माराम कौतिक गंभीर

उपाध्यक्ष: नरेंद्र रघुनाथ माळी

सचिव: किशोर सुखदेव माळी

सहसचिव: (माहिती अपूर्ण)

उर्वरित पदाधिकाऱ्यांची नावे उपलब्ध होताच कार्यकारिणीची संपूर्ण यादी जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



## दोंडाईचातविविधविकासकामांचे भूमिपूजनवउद्घाटन!

जन सम्राट टाईम्स

**दोंडाई | प्रतिनिधी :** दोंडाईचा शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन पालकमंत्री तथा पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल आणि त्यांचे पिताश्री सरकार रावल यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात शिक्षण, कृषी व दुग्ध व्यवसायाशी संबंधित महत्त्वाच्या प्रकल्पांचा शुभारंभ करण्यात आला.

यामध्ये दादासाहेब रावल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन, दूध प्रक्रिया प्रकल्पाचे भूमिपूजन तसेच दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची उपस्थिती अपेक्षित होती.

मात्र, अपरिहार्य कारणामुळे त्यांचा दौरा रद्द झाल्याने त्यांनी ऑनलाइन माध्यमातून कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ऑनलाइन सहभाग नोंदवत विकासकामांसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यानंतर सरकार रावल यांच्या वाढदिवसानिमित्त विविध मान्यवरांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार रावल, सरकार रावल, आमदार अनुप अग्रवाल, राम भदाणे, काशीराम पावरा, मंजुळा गावित, दोंडाईचा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा नयनकुवर रावल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, महापौर मायादेवी परदेशी, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे, रावसाहेब गिरासे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ममुराबाद येथे पूरग्रस्तांच्या मदतीला धावला जीपीएस ग्रुप

### १०८ नागरिकांना किराणा किटचे वाटप पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मदत

जन सम्राट टाईम्स



**ममुराबाद / पाळधी | प्रतिनिधी :** जळगाव तालुक्यातील ममुराबाद येथे मुसळधार पावसामुळे लेंडी नाल्याला आलेल्या पुराचा मोठा फटका नाल्यालगतच्या भिल्ल वस्तीला बसला. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने अन्नधान्य, घरगुती साहित्य व जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले. या संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी जीपीएस ग्रुपने पुढाकार घेत १०८ पूरग्रस्त नागरिकांना किराणा किटचे वाटप केले. गावचे सरपंच व ग्रामस्थांनी पूरस्थितीची माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील तसेच युवा नेते व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांना दिल्यानंतर, पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली जीपीएस ग्रुपने तातडीने मदतकार्य सुरू केले. तयार करण्यात आलेल्या किराणा किटचे वितरण प्रतापराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. मदत वाटपापूर्वी प्रतापराव पाटील यांनी भिल्ल वस्तीतील पूरग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी घरांमध्ये जाऊन नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या नुकसानीची माहिती घेतली. तसेच बाधित घरे, रस्ते आणि परिसराची पाहणी करून पूरग्रस्तांना धीर दिला. यावेळी प्रतापराव पाटील म्हणाले, "संकटाच्या काळात गरजूंच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हीच खरी समाजसेवा आहे. पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जीपीएस ग्रुपने मदत साहित्याबरोबरच संकटात आपण एकटे नाही, हा विश्वासही पूरग्रस्त कुटुंबांना दिला आहे. समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने अशा वेळी मदतीचा हात पुढे करणे हीच खरी माणुसकी आहे." या प्रसंगी ममुराबादचे उपसरपंच विलास सोनवणे, युवा सेनेचे किरण पाटील, राहुल ढाके, किरण पुंडलिक पाटील, गोपाल मोरे, लक्ष्मीबाई भिल्ल, वासुदेव ढाके, चंदू नाना पाटील, सुनीलभाऊ वाघोडे, प्रमोदभाऊ शिंदे, मुकुंद मुंदडा, तुरखेडाचे सरपंच नितीन सपकाळे, पत्रकार सचिनभाऊ पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी युवा सेनेचे किरण पाटील यांनी गावकऱ्यांच्या वतीने जीपीएस ग्रुप, पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि प्रतापराव पाटील यांचे आभार मानले. या मदतीमुळे पूरग्रस्त कुटुंबांना मोठा आधार मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# जे. जे. रुग्णालयात खळबळ; अस्थिरोग विभागातील प्राध्यापकाविरोधात गंभीर आरोप!

## रुग्णाच्या उपचारातील कथित हलगर्जीपणा, निष्पक्ष चौकशीची मागणी

विक्रांत पाटील

**जन सम्राट टाईम्स | मुंबई:** मुंबईतील जे. जे. रुग्णालयाच्या अस्थिरोगशास्त्र (ऑर्थोपेडिक्स) विभागातील एका वरिष्ठ प्राध्यापकाविरोधात निवासी डॉक्टरांनी विविध गंभीर आरोप करत लेखी तक्रारी दाखल केल्याचा दावा समोर आला आहे. संबंधित प्राध्यापक डॉ. नितीन महाजन यांच्यावर निवासी डॉक्टरांचा मानसिक व आर्थिक छळ, विद्यार्थ्यांच्या सह्यांबाबत कथित अनियमितता तसेच एका रुग्णाच्या उपचारातील कथित हलगर्जीपणाबाबत आरोप करण्यात आले असून या प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, ६ फेब्रुवारी २०२६ रोजी १५ कनिष्ठ निवासी डॉक्टरांनी अधिष्ठातांकडे सादर केलेल्या पत्रात डॉ. महाजन यांच्याकडून वैयक्तिक खर्च निवासी डॉक्टरांवर टाकला जात असल्याचा आरोप केला आहे. महागड्या भेटवस्तू, घड्याळे, इयरफोन्स तसेच विविध कार्यक्रमांच्या खर्चासाठी आर्थिक दबाव आणला जात असल्याचे या पत्रात नमूद करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

याशिवाय, ५ मार्च २०२६ रोजी निवासी डॉक्टर डॉ. रौनक सिन्हा यांनी सादर केलेल्या स्वतंत्र निवेदनात वैयक्तिक कामांसाठी दबाव आणला जात असल्याचा आणि त्यामुळे मानसिक तणाव निर्माण झाल्याचा आरोप केल्याचे सांगितले जात आहे.




### बनावट सह्यांचा कथित आरोप

५ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) समोर दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत विद्यार्थ्यांच्या संमतीशिवाय पदव्युत्तर मार्गदर्शक बदलण्यासाठी त्यांच्या बनावट सह्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच विभागातील कार्यपद्धतीबाबतही काही विद्यार्थ्यांनी आक्षेप नोंदविल्याचा दावा करण्यात आला आहे.

अशा मागण्यांना विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक स्तरावर त्रास दिला जात असल्याचाही दावा करण्यात आला आहे. रुग्णाच्या उपचारांबाबतही आरोप तक्रारीनुसार, २४ फेब्रुवारी २०२६ रोजी गंभीर जखमी भास्कर मुगम यांना वेळेत दाखल करून उपचार देण्यात आले नाहीत, तसेच इतर रुग्णालयात पाठविण्यात आल्यामुळे उपचारास विलंब झाला, असा आरोप करण्यात आला आहे. या कथित विलंबामुळे रुग्णाचा पाय कापावा लागला आणि नंतर त्यांचा मृत्यू झाल्याचा दावा संबंधित घटना अहवालात करण्यात आला असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. या आरोपांची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक असून, संबंधित घटनांबाबत अधिकृत निष्कर्ष अद्याप समोर आलेले नाहीत.

### २०१९ मधील चौकशीचा उल्लेख

तक्रारीत २०१९ मधील एका चौकशी अहवालाचाही उल्लेख करण्यात आला असून, त्यावेळी एका विद्यार्थ्याच्या मूल्यमापनासंदर्भात अनियमिततेचे निरीक्षण नोंदविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

### निष्पक्ष चौकशीची मागणी

संबंधित सर्व तक्रारी, निवेदने आणि उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात डॉ. नितीन महाजन किंवा जे. जे. रुग्णालय प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप उपलब्ध झालेली नाही. त्यांची बाजू समोर आल्यानंतर तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

# चोपडा येथे राष्ट्रीय वर्षावास प्रवचन मालिकेचे दुसरे पुष्प संपन्न



जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी:** भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व अंतर्गत चोपडा तालुक्याच्या वतीने गौतम नगर समाज मंदिर येथे राष्ट्रीय वर्षावास प्रवचन मालिकेचे दुसरे पुष्प उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे कोषाध्यक्ष आयु. जानकीराम शंकर सपकाळे होते. कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर उपस्थितांनी त्रिशरण व पंचशील ग्रहण केले. यावेळी 'भगवान बुद्ध आणि त्यांचा कर्मसिद्धांत' या विषयावर बौद्धाचार्य आयु. महेंद्र प्रल्हाद म्हैसरे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी भगवान बुद्धांच्या कर्मसिद्धांताचे महत्त्व, नैतिक जीवनातील त्याचे स्थान आणि समाजकल्याणासाठी त्याची उपयुक्तता याविषयी सविस्तर विवेचन केले. कार्यक्रमास शहराध्यक्ष भरत भिमराव शिरसाठ, समता सैनिक दल प्रमुख आयु. शालिग्राम व्यंकट करंदीकर, जानकीराम शंकर सपकाळे, संजय पिरा अहिरे तसेच भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. सुकदेव लक्ष्मण बाविस्कर यांनी केले, तर अनिल गोरख वाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# रिंगणगाव प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरवस्था!


## उपचार कक्षात पाणी, रुग्णांची गैरसोय

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल | प्रतिनिधी :** रिंगणगाव येथील जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उपचार कक्षाला मोठ्या प्रमाणावर गळती लागत असल्याने रुग्णांसह वैद्यकीय कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात छतामधून सतत पाणी गळत असल्याने उपचार कक्षात रुग्णांना ठेवणेही कठीण होत असून, आरोग्य सेवांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. आरोग्य विभागाकडून उपचार कक्षाच्या छताची दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र, दुरुस्तीनंतरही गळती थांबलेली नसल्याने समस्या कायम आहे. त्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असून, डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनाही कामकाज करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

दरम्यान, रिंगणगाव येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र, इमारतीतील इलेक्ट्रिक फिटिंगच्या कामासाठीचे टेंडर रखडल्यामुळे ही इमारत अद्याप कार्यान्वित करण्यात आलेली नाही. संबंधित विभागाने या कामासाठी दुसऱ्यांदा टेंडर प्रक्रिया सुरू केल्याची माहिती दिली असली, तरी प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. परिणामी, कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली सुसज्ज इमारत वापराविना पडून आहे, तर दुसरीकडे रुग्णांना गळक्या आणि जीर्ण इमारतीत उपचार घ्यावे लागत आहेत.

ही परिस्थिती नागरिकांमध्ये नाराजी निर्माण करणारी ठरत



आहे. रिंगणगाव व परिसरातील ग्रामस्थांनी आरोग्य विभागाकडे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रातील उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून आरोग्य सेवा नव्या इमारतीत सुरू करण्याची मागणी केली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुग्णांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन प्रशासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.रिंगणगाव येथील जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उपचार कक्षाला मोठ्या प्रमाणावर गळती लागत असल्याने रुग्णांसह वैद्यकीय कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात छतामधून सतत पाणी गळत असल्याने उपचार कक्षात रुग्णांना ठेवणेही कठीण होत असून, आरोग्य सेवांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. आरोग्य विभागाकडून उपचार कक्षाच्या छताची दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र, दुरुस्तीनंतरही गळती थांबलेली नसल्याने समस्या कायम आहे. त्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असून, डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनाही कामकाज करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

# म्युनिसिपल हायस्कूलमध्ये अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी!

## महापुरुषांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी:** नगरपरिषद संचलित म्युनिसिपल हायस्कूल, भुसावळ येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन व आदरांजली कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस, तर सेवाज्येष्ठ शिक्षिका सरला सावकारे यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर उपस्थित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. यावेळी सरला सावकारे, संध्या धांडे, डॉ. प्रदीप साखरे आणि संजीव चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि परिवर्तनवादी कार्याचा परिचय करून दिला. तसेच श्रमिक, वंचित आणि कष्टकरी समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील नेतृत्व, सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंतीच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहिती देण्यात आली. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" या त्यांच्या घोषणेचे ऐतिहासिक महत्त्वही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने यांनी अण्णाभाऊ साठे हे समाजजागृती करणारे क्रांतिकारी साहित्यिक असून लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे प्रेरणास्थान असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी या दोन्ही महापुरुषांचे विचार आत्मसात करून आपल्या जीवनात त्यांचा आदर्श अंगीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास सरला सावकारे, शालिनी बनसोडे, डॉ. प्रदीप साखरे, वरिष्ठ लिपिक प्रविण चौधरी, ग्रंथपाल अरुण नेटके यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. एच. राठोड यांनी केले, तर पुनम देवकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डी. के. भंगाळे, नाना पाटील, मनोज किरंगे, निलेश बोराडे, ज्योती शिरतुरे, रेखा सोनवणे, लक्ष्मण पवार, राजेंद्र बागुल आणि रोहन पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# उमेद – उद्याची पहाट २०२६' : मुलांना नवी दिशा देणारा जळगाव पोलिसांचा उपक्रम

## पुनर्वसन, आणि मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। (प्रतिनिधी):** कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच गुन्हेगारीचे प्रमाण कमी करणे आणि चुकीच्या मार्गावर गेलेल्या बालकांना नवजीवन देणे या उद्देशाने जळगाव जिल्हा पोलीस दलाने 'उमेद – उद्याची पहाट २०२६' या अभिनव उपक्रमांतर्गत जिल्हास्तरीय पुनर्वसन कार्यशाळेचे आयोजन केले. पोलीस मुख्यालयातील पद्मालय हॉल येथे आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन मुख्य जिल्हा न्यायाधीश यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्ह्यात प्रथमच अशा व्यापक स्वरूपाची पुनर्वसन कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून, १५० हून अधिक बालविधीसंघर्षग्रस्त (Juveniles in Conflict with Law) मुलांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या मुलांना पुन्हा सकारात्मक वाटेवर आणणे, त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे, गुन्हेगारीपासून कायमस्वरूपी दूर ठेवणे आणि जबाबदार नागरिक म्हणून घडविणे हा या उपक्रमाचा



प्रमुख उद्देश होता. कार्यशाळेत विविध स्वयंसेवी संस्थांनी सक्रिय सहभाग घेतला. केशव स्मृती प्रतिष्ठानचे भरत अमळकर तसेच आधार संस्थाच्या विद्या सोनार यांच्यासह विविध तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत व्यक्तिमत्त्व विकास, जीवनकौशल्ये, शिक्षणाचे महत्त्व, व्यसनमुक्ती, कौटुंबिक नातेसंबंध, सामाजिक जबाबदारी आणि आत्मविश्वास वाढविणे या विषयांवर मार्गदर्शन केले. समुपदेशनाच्या माध्यमातून मुलांच्या मनातील भीती, संभ्रम आणि नकारात्मक विचार दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांना नव्याने स्वप्ने पाहण्याची, स्वतःच्या आयुष्याला सकारात्मक दिशा देण्याची आणि समाजात सन्मानाने उभे राहण्याची प्रेरणा देण्यात आली. उपक्रमात सहभागी झालेल्या मुलांच्या सुरक्षित प्रवासासाठी जळगाव पोलिसांनी शालेय बसची व्यवस्था केली होती. प्रत्येक मुलाची स्वतंत्र नोंदणी करून त्यांच्या वैयक्तिक परिस्थितीनुसार पुनर्वसन आणि समुपदेशनाचा आराखडा तयार करण्यात आला. कार्यशाळेनंतरही स्थानिक पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून प्रत्येक मुलाचा सातत्याने पाठपुरावा केला जाणार असून स्वयंसेवी संस्था, पालक, शैक्षणिक संस्था आणि प्रशासन यांच्या समन्वयातून शिक्षण, कौशल्यविकास, रोजगार आणि सामाजिक पुनर्वसनासाठी आवश्यक सहकार्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व मुलांना हॅवरसॅक बॅगचे वाटप करण्यात आले. या बॅगचे प्रायोजकत्व राजेंद्र यवले यांनी केले.जळगाव पोलीस दलाचा हा उपक्रम केवळ गुन्हेगारी नियंत्रणापुरता मर्यादित नसून, चुकीच्या मार्गावर गेलेल्या मुलांना समाजात सन्मानाने जगण्याची नवी संधी देणारा ठरत आहे.

# सागवान लाकडासह दुचाकी जप्त; आरोपी फरार

जन सम्राट टाईम्स

**यावल । प्रतिनिधी:** यावल पश्चिम वनविभागाच्या पथकाने हरिपुरा-कोरपावली रस्त्यावर गस्तीदरम्यान कारवाई करत सागवान लाकूड व दुचाकीसह सुमारे ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मात्र, संशयित आरोपी घटनास्थळावरून फरार झाल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. माहितीनुसार, १ ऑगस्टच्या रात्री वनविभागाचे पथक हरिपुरा-कोरपावली मार्गावर गस्त घालत



असताना संशयित दुचाकीस्वाराचा पाठलाग करण्यात आला. वनकर्मचाऱ्यांची चाहूल लागताच संबंधिताने सुमारे ४२ हजार रुपये किमतीची दुचाकी आणि अंदाजे २ हजार रुपये किमतीचे सागवान लाकडाचे चार चौपट घटनास्थळी टाकून पलायन केले. या प्रकरणी हरिपुरा वनरक्षकांनी वनगुन्हा दाखल केला असून, फरार आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे. दरम्यान, अशा कारवायांमध्ये वारंवार केवळ मुद्देमाल जप्त होतो, मात्र आरोपी हाती लागत नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. परिसरात जुन्या परवान्यांचा गैरवापर करून नव्याने तोडलेल्या सागवान लाकडापासून बेकायदेशीररीत्या फर्निचर तयार केले जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. त्यामुळे संबंधित तस्करीच्या साखळीचा पर्दाफाश करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून केली जात आहे.

# पारोळ्यात साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती

## सामाजिक समता व बंधुतेचा संदेश



जन सम्राट टाईम्स

**पारोळा| प्रतिनिधी :** साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पारोळा शहरातील अमळनेर चौफुली लगत असलेल्या त्यांच्या पुतळ्यास आमदार ॲड. अमोल पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि परिवर्तनवादी कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी आमदार ॲड. अमोल पाटील यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा उल्लेख करत, "ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नव्हे, तर कष्टकरी जनतेच्या तळहातावर तरलेली आहे," हा त्यांचा विचार आजही कष्टकरी, शोषित आणि वंचित समाजाच्या स्वाभिमानाचा बुलंद आवाज असल्याचे सांगितले. कार्यक्रमास लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील, माजी नगराध्यक्ष दयारामअण्णा पाटील, शिवसेना शहरप्रमुख तथा गटनेते अमृतभाऊ चौधरी, उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनिषभाऊ पाटील, नगरसेवक मनोजभाऊ जगदाळे, राजूभाऊ कासार, शिवसेना उपगटनेते पंकजभाऊ मराठे, शिवसेना प्रतोद नितीनभाऊ सोनार, नगरसेवक नजीरखान बेलदार, युवासेना शहरसंघटक प्रशांत पाटील यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, शाहिरी आणि लोककलेच्या माध्यमातून समाजातील अन्याय, विषमता, दारिद्र्य आणि शोषणाविरोधात उभारलेल्या संघर्षाची आठवण करून दिली. कष्टकरी, शेतमजूर, कामगार, दलित आणि वंचित समाजाच्या वेदनांना त्यांनी आपल्या लेखणीतून प्रभावीपणे मांडत सामाजिक समता, बंधुता, स्वाभिमान आणि मानवतेचा संदेश दिला, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनविले. प्रत्येकाला समान संधी, सन्मानाने जगण्याचा अधिकार आणि न्यायपूर्ण समाजव्यवस्था निर्माण व्हावी, हा त्यांच्या विचारांचा मूलमंत्र आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला अभिवादन करत सामाजिक समता, शिक्षण, बंधुता आणि न्यायपूर्ण समाज घडविण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या विचारांचा प्रकाश समाजाला सदैव दिशा देत राहो, अशी भावना व्यक्त करत जयंती कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी प्रशासनासह मैदानात आमदार ॲड. अमोल पाटील

## टोळी, तरडी, उंदीरखेडेसह टिटवी परिसराची पाहणी; सुरक्षिततेबाबत प्रशासनाला सूचना

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यासह पारोळा तालुक्यात झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीची पार्श्वभूमीवर पारोळा-एरंडोलचे आमदार ॲड. अमोल पाटील यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्यासमवेत पूरग्रस्त गावांना भेट देत परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी बाधित नागरिकांशी संवाद साधून त्यांना धीर देत शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहत असून अनेक गावांमध्ये पाणी



शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अनेकांच्या घरांमध्ये पाणी शिरल्याने संसारोपयोगी वस्तूंचेही नुकसान झाले आहे. आमदार अमोल पाटील यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या समवेत मुंदाणे (प्र.उ.), देवगाव, टोळी, तरडी आणि उंदीरखेडे या पूरग्रस्त गावांना भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. अनेक कुटुंबांच्या अडचणी जाणून घेत त्यांनी प्रशासनाला मदतकार्य अधिक गतिमान करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान, टिटवी येथील पाचपांडव मंदिराजवळील धरण ओव्हरफ्लो झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी शिरले. त्यामुळे अनेक शेतांमधील सौर ऊर्जा प्रकल्पांचे संचही पाण्याखाली जाऊन नुकसान झाल्याची माहिती यावेळी समोर आली. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत आमदार अमोल पाटील यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याचे, बाधित नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्याचे, अन्न, पिण्याचे पाणी, औषधे तसेच पशुधनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. शासनाकडून मिळणाऱ्या सर्व मदतीचा लाभ पात्र नागरिकांना वेळेत मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. हवामान विभागाने पुढील काही दिवसही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, नदी-नाले व पुलांवर जाणे टाळावे तसेच स्वतःची व कुटुंबाची सुरक्षितता जपावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या पाहणी दौऱ्यात जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषद कृषी सभापती डॉ. दिनकर पाटील, तहसीलदार डॉ. उल्हास देवरे, गटविकास अधिकारी डॉ. भूषण कदम, पोलीस निरीक्षक दीपक पवार, तालुकाप्रमुख मधुकर पाटील, समीर पाटील, आधार पाटील, डॉ. राजेंद्र पाटील, एकनाथ पाटील, संबंधित ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठांची सेवा हीच खरी परमेश्वराची सेवा

## पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील : 'चेहऱ्यावर हास्य... हाच खरा जनसेवेचा आनंद

जन सम्राट टाईम्स

**पाळधी/जळगाव|प्रतिनिधी :** ज्येष्ठांच्या डोळ्यांत पुन्हा प्रकाश फुलवणे म्हणजे त्यांच्या उर्वरित आयुष्याला आनंद, आत्मविश्वास आणि स्वाभिमानाची नवी पहाट देणे होय. जो दुसऱ्यासाठी जगतो तोच खऱ्या अर्थाने जीवन जगतो. ज्येष्ठांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि त्यांच्या डोळ्यांतील प्रकाश हाच माझ्या जनसेवेचा खरा पुरस्कार आहे. ज्येष्ठांची सेवा हीच परमेश्वराची खरी सेवा आहे," असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी केले. जीपीएस परिवाराच्या पुढाकारातून पाळधी येथील सुगोकी लॉन येथे आयोजित मोफत चष्मा वितरण कार्यक्रमात धरणगाव व जळगाव तालुक्यातील पात्र ठरलेल्या सुमारे ६५० ज्येष्ठ नागरिकांना पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले. पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, जळगाव ग्रामीण मतदारसंघातील १७ हजारांहून अधिक दृष्टीदोष असलेल्या नागरिकांची आतापर्यंत मोफत नेत्रतपासणी करण्यात आली असून आवश्यकतेनुसार अनेकांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तसेच अनेक गरजू रुग्णांना पनवेल येथील नामांकित रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. वृद्धांना शहरात येण्याचा त्रास होऊ नये म्हणून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त सुरू करण्यात आलेल्या फिरत्या नेत्रालयाच्या माध्यमातून गावागावांत नेत्रतपासणी शिबिरे आयोजित केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरांमधील तपासणीनंतर पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना मोफत चष्मे वितरित करण्यात आले. अनेक गावांतील ज्येष्ठांना लाभ जीपीएस परिवारातर्फे आयोजित मोफत नेत्रतपासणी शिबिरे धरणगाव तालुक्यातील बिलखेडा, कल्याणे खुर्द, धरणगाव, सोनवद, नांदेड, पाळधी तसेच जळगाव तालुक्यातील आसोदा, मनुराबाद, जळके, नशिराबाद, विदगाव आणि म्हसावद येथे घेण्यात आली होती. या शिबिरांमध्ये तपासणी झालेल्या पात्र ६५० लाभार्थ्यांना या कार्यक्रमात मोफत चष्म्यांचे वितरण करण्यात आले. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जीपीएस परिवाराच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत, गावागावांत जाऊन आरोग्यसेवा सर्वसामान्यांच्या दारी पोहोचविण्याचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे सांगितले. समाजासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था आणि कार्यकर्ते हेच समाजाची खरी ताकद असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी केले. त्यांनी जीपीएस परिवारामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची व नेत्रतपासणी मोहिमेची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजिंक्य जोशी यांनी केले, तर धनराज कासट यांनी आभार मानले.

### मान्यवरांची उपस्थिती

यावेळी युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अनिल भोळे, तालुकाप्रमुख शिवराज पाटील, माजी सभापती पती जनाआप्पा कोळी, विकास सोसायटीचे चेअरमन जितू पाटील, संदीप सुरळकर, विदगावचे सरपंच राजेंद्र कोळी यांच्यासह विविध पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जीपीएस परिवाराचे सर्व पदाधिकारी, संचालक तसेच सचिन भोई आणि अजय कोळी यांनी विशेष परिश्रम घेतले.



# 'उजेड पेरणारी माणसं' पुस्तकावर भडगावात वाचक कट्टा

जन सम्राट टाईम्स

**भडगाव |प्रतिनिधी:** भडगाव शहरातील जागृती मित्र मंडळ संचलित जागृती वाचनालयात शनिवारी आयोजित करण्यात आलेला 'वाचक कट्टा' हा साहित्यिक उपक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात पत्रकार संजय पवार यांनी भुसावळ येथील लेखक आनंदा पाटील लिखित बहुचर्चित 'उजेड पेरणारी माणसं' हे पुस्तक वाचनालयाला भेट देत उपस्थित वाचकांसमोर पुस्तकाचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संजय पवार यांनी पुस्तकाला देवा झिंजाड यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतील विचार आणि लेखकाच्या 'अंतरीचे बोल' या मनोगतातील भावना प्रभावीपणे उलगडून सांगितल्या.

वडिलांना दिलेला शब्द पाळण्यासाठी पुस्तक लेखन पूर्ण करणाऱ्या लेखकाच्या जिद्दीचा उल्लेख करत त्यांनी आधुनिक काळातील कर्तव्यनिष्ठेचे उदाहरण मांडले. 'उजेड पेरणारी माणसं' या पुस्तकात विविध क्षेत्रांत निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या ८४ प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा जीवनप्रवास शब्दबद्ध करण्यात आला आहे. त्यापैकी काही निवडक व्यक्तींच्या कार्याचा परिचय करून देताना संजय पवार यांनी त्यांच्या समाजोपयोगी कार्याची माहिती उपस्थितांना दिली. समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या अशा व्यक्तींची माहिती प्रत्येकाने जाणून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना त्यांनी, "या पुस्तकातील प्रत्येक शब्द हा समाजासाठी स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवून कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाला वाहिलेली कृतज्ञ आदरांजली आहे. प्रत्येकाने हे पुस्तक आवर्जून वाचावे," असे आवाहन केले. या साहित्यिक चर्चेमुळे उपस्थित वाचकांना पुस्तकातील विचार, समाजकार्याची प्रेरणा आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचा परिचय झाला. कार्यक्रमात पुस्तकातील विविध प्रसंगांवरही उपस्थितांनी मनमोकळी चर्चा केली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# खर्डा येथे अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती

## रक्तदान शिबिरात ८७ जणांचे रक्तदान

जन सम्राट टाईम्स




**अहिल्यानगर | प्रतिनिधी :** जामखेड तालुक्यातील ऐतिहासिक खर्डा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात तब्बल ८७ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. कार्यक्रमाच्या प्रारंभी खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत, सामाजिक कार्यकर्ते अभी मिसाळ, विशाल पवार, ग्रामपंचायत सदस्य दादा जावळे यांच्यासह मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी नीता इंगळे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार बाळासाहेब शिंदे यांनी केले, तर सूत्रसंचालन भीमा घोडेराव यांनी केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचा समाजाने आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. जयंतीनिमित्त सुरभी ब्लड सेंटर, अहिल्यानगर आणि जामखेड ब्लड स्टोरेज यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. विकास जरे व सहकारी यांच्या पुढाकारातून स्वर्गीय लखन मिसाळ यांच्या स्मरणार्थ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ८७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून रक्तदान केले. यावेळी दिवंगत अमोल मोरे तसेच मार्केट कमिटीचे संचालक वैजीनाथ पाटील यांचे वडील कै. पोपट लोंढे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती, खर्डाचे शहराध्यक्ष गणेशभाऊ जाधव यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जयंतीनिमित्त वृक्षारोपण तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीवही अधोरेखित करण्यात आली. कार्यक्रमास पोलीस कॉन्स्टेबल शशिकांत म्हस्के, विलास जाधव, अण्णाभाऊ साठे क्रांती फोर्सचे पुणे जिल्हाध्यक्ष अनिल कांबळे, युवा ढावरे, मदन पाटील, दीपक जावळे, भीमराव घोडेराव, अखिलेश शिंदे, अलीशेर कुरेशी, जितेंद्र पगारे, शंकर गायकवाड, लखन जाधव, दादा मोरे, समाधान जाधव, अंकुश डाडर, आतिश जाधव, किरण गायकवाड, नितीन आहेर, कृष्णा आलाट, कृष्णा थोरात, प्रवीण सदाफुले, अजय जाधव यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जन्मदात्या बापाचे क्रौर्य!
# झोपेतच दोन लेकरांवर कुऱ्हाडीने हल्ला!

## नशेत हल्ल्याचा संशय; आरोपीला अडावद पोलिसांनी घेतले ताब्यात

जन सम्राट टाईम्स



**चोपडा | प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील वडती गावात जन्मदात्या बापाने आपल्या दोन अल्पवयीन मुलांवर झोपेत असताना कुऱ्हाडीने हल्ला केल्याची हृदयद्रावक घटना रविवारी पहाटे उघडकीस आली. या भीषण हल्ल्यात १३ वर्षीय मुलीचा जागीच मृत्यू झाला, तर ११ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत मुलीचे नाव मीरा सुभाष भिलाला (वय १३) असून, जखमी मुलगा रामू सुभाष भिलाला (वय ११) याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.

या प्रकरणातील आरोपी सुभाष गोपाळ भिलाला (वय ५०) हा घटना घडल्यानंतर जंगलाच्या दिशेने फरार झाला होता. घटनेची माहिती मिळताच अडावद पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने शोधमोहीम राबवून आरोपीला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी सुरू असून हत्येमागील नेमके कारण शोधले जात आहे. झोपेत असतानाच जीवघेणा हल्ला प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही मुले घरात झोपेत असताना आरोपीने कुऱ्हाडीने त्यांच्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात मीरा हिचा जागीच मृत्यू झाला, तर रामू गंभीर जखमी झाला. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला होता. हल्ल्यामागील कारणांचा शोध या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राथमिक माहितीनुसार आरोपीला दारूचे व्यसन असल्याची माहिती समोर आली असून, कौटुंबिक वाद, मानसिक स्थिती किंवा अन्य कोणत्या कारणातून हा प्रकार घडला का, याचा तपास पोलीस सर्व बाजूंनी करत आहेत. या संदर्भातील कोणतीही बाब अधिकृत तपास पूर्ण होईपर्यंत निश्चित मानलेली नाही.या प्रकरणातील आरोपी सुभाष गोपाळ भिलाला (वय ५०) हा घटना घडल्यानंतर जंगलाच्या दिशेने फरार झाला होता. घटनेची माहिती मिळताच अडावद पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने शोधमोहीम राबवून आरोपीला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी सुरू असून हत्येमागील नेमके कारण शोधले जात आहे. झोपेत असतानाच जीवघेणा हल्ला प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही मुले घरात झोपेत असताना आरोपीने कुऱ्हाडीने त्यांच्यावर सपासप वार केले. गावात शोककळा या अमानुष घटनेमुळे वडती गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. अडावद पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुरावे संकलित केले असून आरोपीविरुद्ध खुनासह संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील तपास अडावद पोलीस करीत आहेत.

# अवैध दारूधंद्यावर ग्रामस्थांचा एल्गार

## कारवाई न झाल्यास भीम आर्मीतर्फे आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स



**यावल | प्रतिनिधी :** यावल तालुक्यातील मोहराळा येथे सुरू असलेल्या कथित अवैध दारूधंद्याविरोधात ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त करत संबंधितांवर तात्काळ व कठोर कारवाईची मागणी केली आहे. अवैध दारूविक्री कायमस्वरूपी बंद करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा यावल पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन, आमरण उपोषण तसेच तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

यासंदर्भात ग्रामस्थांच्या वतीने यावल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात मोहराळा गावात अनेक ठिकाणी अवैध दारूची विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात आला असून त्यामुळे गावातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, दारूच्या व्यसनामुळे युवक भरकटत असून अनेक कुटुंबे आर्थिक आणि सामाजिक अडचणीत सापडत आहेत. महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून गावातील शांतता आणि सामाजिक सलोखा धोक्यात आल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. ग्रामस्थांनी असा आरोप केला की, या प्रकाराबाबत वारंवार तोंडी तक्रारी करूनही प्रभावी कारवाई झालेली नाही. त्यामुळे गावातील सर्व कथित अवैध दारू अड्ड्यांवर विशेष पथकाद्वारे धडक कारवाई करून संबंधित आरोपींना अटक करावी. तसेच या अवैध व्यवसायाला संरक्षण देणाऱ्यांची निष्पक्ष चौकशी करून त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अवैध दारूविक्री कायमस्वरूपी बंद करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा यावल पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन, आमरण उपोषण तसेच तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

यावेळी गौरव सोनवणे (भीम आर्मी भारत एकता मिशन, यावल तालुका सचिव), सतीश अडकमोल (ऑल इंडिया पँथर सेना, यावल तालुका अध्यक्ष), विनोद अडकमोल, गोविंदा सोनवणे, सचिन वानखेडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. निवेदनानंतरही तातडीने कारवाई न झाल्यास भीम आर्मी भारत एकता मिशनच्या नेतृत्वाखाली यावल पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन, आमरण उपोषण, मोर्चा तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रारी करून व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. "मोहराळा दारूमुक्त झाल्याशिवाय आमचा लढा थांबणार नाही," असा निर्धार ग्रामस्थांसह भीम आर्मीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारताचा ऐतिहासिक सुवर्णदिवस!

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद। प्रतिनिधी:** स्कॉटलंडमधील ग्लास्गो येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारताच्या जुडोपटूंनी ऐतिहासिक कामगिरी करत देशाच्या क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा पराक्रम केला आहे.

अस्मिता डे आणि हर्ष सिंग यांनी आपल्या-आपल्या वजनी गटात सुवर्णपदक पटकावत कॉमनवेल्थ गेम्सच्या इतिहासात भारताला प्रथमच जुडो प्रकारात सुवर्णपदक मिळवून दिले.

महिलांच्या ४८ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात अस्मिता डे हिने कॅनडाच्या प्रतिस्पर्ध्यावर मात करत सुवर्णपदक जिंकले. तिचा हा विजय केवळ वैयक्तिक यश नसून भारतीय जुडोसाठी ऐतिहासिक ठरला आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये वडिलांच्या निधनानंतरही तिने खचून न जाता कठोर मेहनत घेतली.त्यानंतर राष्ट्रीय निवड चाचण्यांमध्ये यश मिळवत तिने ग्लास्गोमध्ये सुवर्णपदकाची कमाई केली. विजयानंतर भावना व्यक्त करताना अस्मिता म्हणाली, "हे सुवर्णपदक माझ्यासाठी, माझ्या राज्यासाठी आणि देशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मी हा विजय माझ्या प्रशिक्षकाला समर्पित करते."



दुसरीकडे, पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात भारताच्या हर्ष सिंग याने ऑस्ट्रेलियाच्या प्रतिस्पर्ध्याचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले. त्याच्या दमदार आणि आक्रमक खेळामुळे भारताच्या पदकतालिकेत आणखी एका सुवर्णाची भर पडली आणि भारतीय जुडोचा नवा अध्याय लिहिला गेला.

भारतीय खेळाडूंच्या या ऐतिहासिक यशाचे देशभरातून स्वागत होत असून क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सामाजिक माध्यमांद्वारे अस्मिता डे आणि हर्ष सिंग यांचे अभिनंदन करत त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीचे कौतुक केले. या दुहेरी सुवर्णामुळे भारताच्या पदकतालिकेत मोठी भर पडली असून ग्लास्गोतील कॉमनवेल्थ स्पर्धेत भारताची कामगिरी अधिक भक्कम झाली आहे. भारतीय खेळाडूंच्या या यशामुळे देशभरातील युवा खेळाडूंना प्रेरणा मिळणार असल्याचे क्रीडा तज्ज्ञांचे मत आहे.

# तहसीलदारांवरील जीवघेण्या हल्ल्याचा पत्रकार संघटनांकडून निषेध

## वाळू माफियांवर कठोर कारवाईची संघटनांकडून मागणी

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ। प्रतिनिधी:** बोदवड तालुक्यात अवैध वाळू वाहतूक करणारा डंपर पकडण्यासाठी गेलेल्या तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे यांच्यावर डंपर अंगावर घालून जीवघेणा हल्ला करण्यात आल्याच्या घटनेचा पत्रकार संघटनांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच महसूल अधिकाऱ्यांना पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. निवेदनानुसार, अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे यांनी प्रसंगावधान राखल्यामुळे ते थोडक्यात बचावले. या प्रकरणात डंपर चालक आकाश सिंग ठाकूर (रा. सालीपुरा, ता. मलकापूर, जि. बुलढाणा) आणि त्याच्या सहा अज्ञात साथीदारांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या घटनेत नायब तहसीलदार अनिल नाडे, कर्मचारी सचिन पाटील तसेच महसूल सेवक ज्ञानेश्वर सुरडकर यांनाही वाहनाखाली ओढून जीवे मारण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. दैनिक जनसम्राटचे संपादक मुकुंद नन्नवरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष संघरत्न सपकाळे, पत्रकार सुरेश पाटोळे, पत्रकार जगदीश सपकाळे आणि पत्रकार वाल्मीक जाधव यांच्या वतीने अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना हे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वीही महसूल अधिकाऱ्यांवर हल्ल्याच्या अनेक घटना घडल्या असून त्यांची सरकारी नोंद आहे. त्यामुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्या माफियांविरोधात कठोर आणि प्रभावी कारवाई करण्यात यावी. तसेच तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे व त्यांच्या पथकाला तातडीने पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी पत्रकार संघटनांनी केली आहे.

# दिपके यांची राज्य पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांकडून सदिच्छा भेट

जन सम्राट टाईम्स

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखेच्या छत्रपती संभाजीनगर (मराठवाडा विभाग) पदाधिकाऱ्यांनी सीजेपीचे अभिजीत दिपके यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत आगामी पुरस्कार सोहळ्याचे निमंत्रणपत्र प्रदान केले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत, ज्येष्ठ पत्रकार मधुकर वैद्य, जिल्हाध्यक्ष छबुराव ताके आणि जिल्हा सरचिटणीस सुजित ताजने उपस्थित होते. याप्रसंगी विश्वास आरोटे यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची वाटचाल, उद्दिष्टे तसेच पत्रकारांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. पत्रकारांच्या संघटनात्मक



बळकटीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. यानंतर अभिजीत दिपके यांचा पुष्पगुच्छ आणि श्री साईबाबांची मूर्ती देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना आगामी पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले. यावेळी पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि संघटनात्मक विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. उपस्थितांनी पत्रकारांच्या हितासाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.